# उपनिबंधक, सहकारी संस्था के/ प विभाग मुंबई

गृहनिर्माण भवन, कक्ष क्र.६९-अे, तळमजला , वांद्रे (पुर्व) मुंबई ४०० ०५१.

---

जा.क्र.मुंबई/ उपनि/के प /दुरुस्ती/ ५०९ /२०१३
दिनांक :- २८/२/१३

प्रति,
चेअरमन/सेक्रेटरी
-----------------------------------
-----------------------------------
-----------------------------------
-----------------------------------

विषय :- महाराष्ट्र सहकारी संस्था (दुरुस्ती) अधिसुचना -२०१३

दिनांक १५/२/२०१३ पासुन महाराष्ट्र सहकारी संस्था (दुरुस्ती) अधिसुचना २०१३ अस्तित्वात आली असुन त्यानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये दुरुस्ती करण्यात आली आहे. त्यानुसार करावयाच्या कामकाजाबाबतच्या महत्वाच्या बाबी तसेच करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे आपणास कळविण्यात येत आहे. या तरतुदीबरोबरच इतर तरतुदींचा समावेश आदर्श उपविधीमध्ये केला जाणार आहे.

१. मा.सहकार आयुक्त यांनी मंजूर केलेला आदर्श उपविधी स्विकारण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभा दि.३०-४-१३ पुर्वी बोलाविणे आवश्यक.

**सभेची विषयपत्रिका**

१. आदर्श उपविधी स्विकारणेबाबत
२. सन २०१२-१३ या वर्षासाठी लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे.
३. सहकार खात्याच्या मंजूर पॅनलवरील लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे बंधनकारक
४. एक लेखापरिक्षक सलग ३ वर्षापेक्षा जास्त एका संस्थेचे लेखापरिक्षण करु शकणार नाही. तसेच त्यास एका वर्षात २० पेक्षा जास्त सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण करता येणार नाही.
५. दिनांक ३१-५-१३ पर्यंत संबधित उपविधी मंजूरीसाठी निबंधक कार्यालयाकडे पाठविणे बंधनकारक

ज्या संस्थाच्या व्यवस्थापक समितीची मुदत यापुर्वीच संपली आहे. अथवा पुढील सहा महिन्यात संपणार आहे त्यांनी अतितात्काळ उपरोक्त कार्यवाही करावी.

**२.वार्षिक सर्वसाधारण सभा**

आर्थिक वर्ष संपल्यानंतर ६ महिन्यात म्हणजे ३० सप्टेंबरच्या आत वार्षिक सभा घेणे बंधनकारक सभा घेण्यास मुदतवाढ देण्याचे अधिकार निबंधक अथवा राज्य शासनास नाहीत.

**३. आर्थिक वर्ष संपल्यावर ६ महिन्यात निंबधकाकडे खालील विवरणपत्रे सादर करणे बंधनकारक**

* संस्थेच्या मागील वर्षातील कार्याची माहिती
* लेखापरिक्षित आर्थिक पत्रके
* नफा वाटणी
* उपविधी दुरुस्ती असल्यास त्याची माहिती
* वार्षिक सभेची तारीख तसेच त्या वर्षात निवडणूक असल्यास मुदत संपत असणारी तारीख
* निबंधकाने कायदा/नियम/उपविधी अनुसरुन विचारलेली इतर माहिती. मागील वर्षात सहकार शिक्षण व प्रशिक्षण घेतलेल्या सभासद, संचालक व कर्मचा-यांची यादी
* लेखापरिक्षकाची नेमणूक व त्याची समंती

**४.निवडणूक**

संस्थेची निवडणूक घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. सर्व संस्थाच्या निवडणूका या राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणामार्फत घेण्यात येणार आहेत. संस्था स्तरावर आता निवडणूका घेता येणार नाही.

१. कर्ज देणा-या संस्थेच्या बाबतीत थकबाकीदार सभासदांना मतदानाचा अधिकार नाही.
२. क्रियाशिल सभासदांना फक्त मतदानाचा अधिकार राहील.

क्रियाशील सभासद म्हणजे तो सलग ५ वर्षात एका वार्षिक सभेस हजर असला पाहिजे आणि त्याने पोटनियमात नमुद केल्याप्रमाणे संस्थेच्या व्यवहारामध्ये सहभाग अथवा संस्थेच्या सेवेचा ५ वर्षातुन १ वेळेस फायदा घेणे आवश्यक

५. तक्रार निवारण समिती.

वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संचालक नसलेल्या ३ अभ्यासु व जेष्ट क्रियाशिल सभासदांची तक्रार निवारण समिती स्थापन करावी.

१. सभासदानी प्रथम या समितीकडे तक्रार करावी.
२. समितीने दोघांना मान्य होईल असा लिखीत तोडगा दोघांचे समतीने काढावा.

६. सहकार शिक्षण व प्रशिक्षण

प्रत्येक संस्थेने राज्य शासनाने अधिसुचित केलेल्या राज्य संघिय संस्था अथवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्थेमार्फत संचालक, सभासद व कर्मचारी यांना खालील नमुद क्षमता निर्माण होण्यासाठी सहकार शिक्षण व प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

१. संस्थेच्या व्यवस्थापनात परिणामकारक व क्रियाशिल सहभाग वाढविणेसाठी
२. कर्मचा-यांमधिल नेतृत्वगुण विकसित होण्यासाठी
३. सभासद व कर्मचारी यांचेमध्ये व्यावसायिक कौशल्य विकसित होण्यासाठी

७. व्यवस्थापक माहिती

१. कोणत्याही सहकारी संस्थेच्या संचालकांची संख्या २१ पेक्षा अधिक असणार नाही.
२. व्यवस्थापक समितीमध्ये-२ महिला, १ अनु जाती/जमाती, १ इतर मागासवर्गीय व १ भटक्या विमुक्त जाती/जमाती- विशेष मागस प्रवर्ग, एवढया जागा राखीव राहतील.
३. व्यवस्थापक समितीचा कालावधी ५ वर्षाचा राहील.
४. व्यवस्थापक समितीने त्यांची मुदत संपण्यापूर्वी ६ महिने अगोदर मुदत संपत असल्याबाबत आणि व्यवस्थापक समितीमध्ये कोणतीही जागा रिक्त झाल्यास अशी जागा रिक्त झाल्यापासुन १५ दिवसाचे आत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास कळविणे बंधनकारक

८. उपरोक्त अधिसुचनेनुसार तात्काळ कार्यवाही होणेकामी खालील नमुन्यात १० दिवसात या कार्यालयास माहिती सादर करावी. माहिती प्राप्त न झाल्यास संस्था बंद आहे असे समजणेत येईल. त्याचबरोबर शक्य असलयास **ddr_mum3@rediffmail.com** या e-mail ID वर माहिती पाठवावी.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | कार्यक्षेत्र | चेअरमन/ सेक्रेटरी नाव व मोबाईल क्र. | सभासद संख्या | मागील निवडणूकीचा दिनांक | निवडणूकी नंतर समितीच्या पहिल्या सभेचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

| समितीचा कार्यकाल समाप्तीचा दिनांक | संस्थेचे शेवटचे लेखापरिक्षण झालेले वर्ष व लेखापरिक्षण वर्ग | दोष दुरुसर्ती अहवाल सादर दिनांक | ठेवी | खेळते भागभांडवल | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ८ | ८ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | |

(राजेंद्र वीर)
उपनिबधक
सहकारी संस्थ के/प विभाग मुंबई